# -:प्रेसनोट:-

## वन विभाग कार्यालय आलापल्ली येथील लाचखोर वन परीक्षेत्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो गडचिरोली यांची मोठी कारवाई

**वनपरिक्षेत्र कार्यालय आलापल्ली येथील आ.लो.से. नामे १) मारोती संभाजी गायकवाड पद. वनपाल, उपक्षेत्र नागेपल्ली,वन परीक्षेत्र कार्यालय आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली वर्ग -३ कर्मचारी** यास ८३,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारतांना तसेच त्यास लाच रक्कम स्विकारणी व मागणी करीता प्रोत्साहन देणारी त्यांची कार्यालयीन वरीष्ठ तथा वनपरीक्षेत्र अधिकारी आ.लो.से.**२) श्रीमती ममता नामदेव राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी वर्ग- २ तसेच तक्रारदारास परस्पर बाहेर भेटुन वरीष्ठांकडे नेवुन प्रकरण मिटवुन देण्याकरीता ३५,०००/- रूपये लाचेची मागणी करणारा आ.लो.से. ३) वनरक्षक गणेश उत्तम राठोड, वर्ग-३** यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीकडे प्राप्त तक्रारीवरून लाच मागणी तसेच सापळा कारवाई प्रकरणात मोठी कारवाई करणेत आलेली असुन सदर तिन्ही लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांचे विरोधात गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार वय वर्षे ४७ यांस शासनाकडुन घरकुल मंजुर झाले होते. दिनांक ०६/०२/२०२५ रोजी १८.३० वा.च्या सुमारास सदर मंजुर घरकुलाचे बांधकामाकरीता विटा बनविणेसाठी आवश्यक असलेली माती ते गावानजिकचे नाल्यातुन आपले नातेवाईकांचे ट्रॅक्टरने व नातेवाईक मजुरांच्या मदतीने भरत असतांना उपक्षेत्र तानबोडी येथील वनपाल आलोसे नामे मारोती संभाजी गायकवाड हे सदर ठिकाणी आले व तक्रारदार यांस ते वन विभागाच्या जागेतुन अवैधपणे माती उत्खनन करीत असल्याचे सांगुन त्यांचे नातेवाईकांचे ट्रॅक्टर ,माती भरणारे मजुर व तक्रारदार यांचेवर वन विभागाचे गुन्हयाची कारवाई करण्याची भिती दाखवली होती. तक्रारदार यांनी सदर माती त्यांचे घरकुलाकरीता आवश्क असल्याचे सांगुन त्यांना कारवाई न करणेबाबत विनंती करता त्यांनी तक्रारदारास गुन्हयाची कारवाई न करण्याकरीता १,१०,०००/- रू. घेवुन दिनांक ०७/०२/२०२५ रोजी वनपरीक्षेत्र कार्यालय आलापल्ली येथे येण्याचे सांगुन लाचेची मागणी करून कारवाईत पकडलेले ट्रॅक्टर स्वतासोबत वनपरीक्षेत्र कार्यालयात घेवुन गेले होते.

तक्रारदार यांना आ.लो.से. मारोती गायकवाड यास लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. गडचिरोली चे पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर ढोले यांना संपर्क साधुन लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगीतल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांनी तक्रारदार यांचे तक्रारीवरून पंचासह लाच मागणी पडताळणी करीता जात असतांना यातील आलोसे नामे गणेश उत्तम राठोड वनरक्षक, फिरते वनसंरक्षक पथक, आलापल्ली याने तक्रारदार यास त्यांचेवर वरीष्ठांना परस्पर भेटवुन सौम्य दंडात्मक कारवाई करून देवुन प्रकरण परस्पर मिटवुन देण्याकरीता ३५,०००/- रूपयांची मागणी केली. यानंतर तक्रारदार हे आलोसे मारोती गायकवाड वनपाल, यास आलोसे नामे ममता राठोड, वनपरीक्षेत्र अधिकारी यांचे दालनात समक्ष भेटले असतांना आलोसे मारोती गायकवाड याने तक्रारदाराकडे सदर प्रकरणी सौम्य दंडात्मक कारवाई करणेकरीता १,१०,०००/- रूपये लाचेची मागणी त्यांचे कार्यालयीन वरीष्ठ आलोसे श्रीमती ममता राठोड व.प.अ.यांचे समक्ष केली असता तक्रारदार यांनी एवढी मोठी रक्कम देणेस असमर्थता दर्शविली

असता वनपरीक्षेत्र अधिकारी श्रीमती ममता राठोड यांनी तक्रारदारास फॉरेस्ट गुन्हा नोंद करून तुरूंगवासाची कारवाई होईल वैगेरे बाबत भिती घालुन लाच रक्कम देणेस हेतुपुर्वक सक्रिय प्रोत्साहन दिले होते.

आलोसे श्रीमती राठोड यांचे दालनातुन बाहेर आल्यावर आलोसे गायकवाड याने तक्रारदाराकडे तडजोडी अंती १,००,०००/- रूपये लाच मागणी करून पैसे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने संबंधितांविरोधात सापळा कारवाई आजमावता दिनांक ०८/०२/२०२५ रोजी यातील आलोसे. वनपरीक्षेत्र अधि. श्रीमती ममता राठोड यांनी पुन्हा पंचासमक्ष तक्रारदाराकडे लाच रकमेसंदर्भात बोलणे करून लाच मागणीस प्रोत्साहन दिले असता आलोसे नामे मारोती गायकवाड याने आलोसे ममता राठोड यांचे समक्ष व त्यांचे दालनात तक्रारदार यांचेकडुन १,००,०००/- रूपये स्विकारून त्यापैकी १७,०००/- रूपयांची तक्रारदारास दंडात्मक कारवाईची पावती देवुन उर्वरीत ८३,०००/-रू. लाच रक्कम म्हणुन स्वताकरीता व त्याची कार्यालयीन वरीष्ठ श्रीमती ममता राठोड हिच्याकरीता स्विकारतांना पंचासमक्ष रंगेहात मिळुन आला असुन सदर प्रकरणी लाच रकमेसह आलोसे वनपाल मारोती संभाजी गायकवाड यास ताब्यात घेवुन त्याचेवर तसेच आलोसे श्रिमती ममता नामदेव राठोड , वनपरीक्षेत्र अधिकारी, आलापल्ली, आलोसे गणेश उत्तम राठोड, वनरक्षक, फिरते वनसंरक्षक पथक, आलापल्ली यांचे विरोधात अहेरीत पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं. ३४/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७, ७अ,१२ अन्वये गुन्हा नोंद करणेत आलेला असुन सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्री. दिगंबर प्रधान , ला.प्र.वि.नागपुर परीक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन कदम, ला.प्र.वि.नागपुर परीक्षेत्र तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पुरंदरे यांचे सुचनेप्रमाणे पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर ढोले यांनी केले असुन सदर कारवाई दरम्यान त्यांना पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील, सहा फौज.श्री.सुनिल पेद्दीवार,पोहवा शंकर डांगे, किशोर जौजांळकर,राजेश पद्मगीरवार, स्वप्नील बांबोळे, पोकॉ संदीप घोरमोडे, संदीप उडान, प्रविण जुमनाके, हितेश जेट्टीवार, म.पोशि.जोत्सना वसाके, विद्या मशाखेत्री, चापोहवा राजेश्वर कुमरे यांनी सहकार्य केले. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली हे करीत असुन अतिदुर्गम भागात एकाच विभागातील एवढया मोठ्या प्रमाणातील लाचखोरांविरोधात कारवाई करण्यात आल्याने सदर दुर्गम भागातील नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.

लाच लुचपत प्रतिबंध विभाग, गडचिरोली सर्व नागरीकांना याव्दारे आववाहन करीत आहे की, त्यांचेकडे कोणीही लोकसेवक त्यांचे प्रलंबित कामकाजा करीता अथवा शासकीय कामाकरीता लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली अथवा टोल फ्रि क्रं. १०६४ व दुरध्वनी क्रमांक ०७१३२-२९५०२० यावर संपर्क साधावा.

(संतोष पाटील)
पोलीस निरिक्षक,
ला.प्र.वि.गडचिरोली